G.R. 200404061514290001-0100

अपर जिल्हाधिकारी, उप सचिव व त्यापेक्षा ज्येष्ट अधिका-यांविरुध्दची विभागीय चौकशी सचिव व विशेष चौकशी अधिकारी [२] व उप सचिव व सादरकर्ता अधिकारी [२] यांचेकडे सोपविणेबाबत.

महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक: संकीर्ण-१९९५/प्र.क्र. २/९५/१०-अ,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

दिनांक : १८ मे, १९९६.

वाचा : शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: आस्थापना-१९९६/प्र.क्र. ३/२६/१९-अ, दिनांक २७ मार्च, १९९६.

-: परिपत्रक :-

अखिल भारतीय सेवेतील अधिकारी, विभाग प्रमुख व मंत्रालयीन विभागातील उप सचिव आणि सह सचिव स्तरावरील अधिका-यांविरुध्द उद्भवणा-या विभागीय चौकशीच्या प्रकरणात चौकशी करण्यासाठी सामान्य प्रशासन विभागाच्या आस्थापनेवर विशेष चौकशी अधिका-याचे पद निर्माण करण्यात आले आहे. या चौकशी अधिका-याकडील प्रलंबित विभागीय चौकशी प्रकरणांची वाढती संख्या लक्षात घेऊन शासनाने दि. २७ मार्च, १९९६ च्या शासन निर्णयान्वये सामान्य प्रशासन विभागाच्या आस्थापनेवर आणखी एक सचिव व विशेष चौकशी अधिका-याचे पद निर्माण करण्यात आले आहे. हे पद निर्माण करण्यात आल्यामुळे सध्याचे विशेष चौकशी अधिका-याचे सादरकर्ता अधिका-याचे पदना
पदनाम "अपर मुख्य सचिव व विशेष चौकशी अधिकारी [१]" व "सह सचिव व सादरकर्ता अधिकारी [१]" असे करण्यात आले आहे. नव्याने निर्माण करण्यात आलेल्या सचिव व विशेष चौकशी अधिका-याचे पदनाम "सचिव व विशेष चौकशी अधिकारी [२] व सादरकर्ता अधिका-याचे पदनाम "उप सचिव व सादरकर्ता अधिकारी [२]" असे करण्यात आले आहे. या नवीन पदाच्या निर्मितीनंतर अपर मुख्य सचिव व विशेष चौकशी अधिकारी [१] व सह सचिव व सादरकर्ता अधिकारी

[......२.

[१] यांचेकडे फक्त अखिल भारतीय सेवेतील अधिका-यांची प्रकरणे सोपविण्यात यावीत.

२. अखिल भारतीय सेवेतील अधिका-यांव्यतिरिक्त राज्य सेवेतील अतिरिक्त जिल्हाधिकारी, सह संचालक, अतिरिक्त संचालक, संचालक, अधीक्षक अभियंता, मुख्य अभियंता, उप सचिव/सह सचिव, विभाग प्रमुख किंवा या संवर्गाशी समकक्ष किंवा वरिष्ठ असलेल्या स्तर संवर्गातील अधिका-यांविरुध्दची विभागीय चौकशीची प्रकरणे "सचिव व विशेष चौकशी अधिकारी [२]" व "उप सचिव व सादरकर्ता अधिकारी [२]" यांचेकडे सोपविण्यात यावीत.

३. या संवर्गातील ज्या अधिका-यांविरुध्दची विभागीय चौकशीची प्रकरणे सध्याच्या विविध अधिका-यांकडे चौकशीसाठी सोपविण्यात आली असतील व ती चौकशीच्या अंतिम टप्प्यापर्यन्त पूर्ण झाली नसतील तर अशी प्रकरणे संबंधित शिस्तभंग विषयक अधिका-यांनी "सचिव व विशेष चौकशी अधिकारी [२]" यांचेकडे सोपविण्याबाबत तात्काळ आदेश काढावेत. सोबतच्या प्रपत्रातील नमूद केलेल्या अधिका-यांविरुध्दची प्रकरणे देखील या चौकशी अधिका-यांकडे सोपविण्याबाबत वर नमूद केल्याप्रमाणे जर ती अंतिम टप्प्यावर पोहोचली नसतील तर या प्रकरणांमध्ये "सचिव व चौकशी अधिकारी [२]" व "उप सचिव व सादरकर्ता अधिकारी [२]" यांच्या नेमणुकीबाबतचे आदेश संबंधित विभागांनी तात्काळ काढावेत व चौकशीच्या प्रकरणाचे अद्ययावत अभिलेख चौकशी अधिका-यांकडे पाठविण्याची तात्काळ कार्यवाही करावी. यापुढे सुरु होणारी प्रकरणे या अधिका-यांकडेच सोपविणे आवश्यक राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

[म. ना. बागुल],
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई,
मुख्य मंत्र्यांचे प्रधान सचिव,
मुख्य सचिव,

अपर मुख्य सचिव व विशेष चौकशी अधिकारी [१],

सह सचिव व सादरकर्ता अधिकारी [१],

सचिव व विशेष चौकशी अधिकारी [२],

उप सचिव व सादरकर्ता अधिकारी [२],

शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,

× सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,

महालेखापाल [लेखा व अनुज्ञेयता], महाराष्ट्र-१, मुंबई,

महालेखापाल [लेखापरीक्षा], महाराष्ट्र-१, मुंबई,

महालेखापाल [लेखा व अनुज्ञेयता], महाराष्ट्र-२, नागपूर,

महालेखापाल [लेखापरीक्षा], महाराष्ट्र-२, नागपूर,

निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई,

अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,

सर्व मंत्रालयीन विभागाच्या नियंत्रणाखालील विभाग प्रमुख,

सर्व मंत्रालयीन विभाग,

गृह विभाग/पोल-२,

महसूल व वन विभाग/फ-७,

निवड नस्ती.

--

× [illegible]

| | | |
|---|---|---|
| 1. | Agriculture & ADF Department | Shri K.D.Mule, Additional Director, Agriculture. |
| 2. | Industrial Energy & Labour Department | Shri [illegible].K. Jadhav, Joint Director of Industries. |
| 3. | Irrigation Department | Shri P.L.Ganu Retd. C.E. |
| 4. | ----"----- | Shri M.K. Kulkarni S.E. |
| 5. | ----"---- | Shri K.U.Kadam C.E. |
| 6. | ----"---- | ----"---- |
| 7. | ----"---- | ----"---- |
| 8. | ----"---- | Shri H.K.Pasrate, Supttd. Engineer |
| 9. | Public Works Department | Shri J.M.Kokane. supttd. Engineer |
| 10- | ----"---- | Shri H.M. Oswal, Executive Engineer. |
| 11. | ----"---- | Shri. J.M. Kokane |
| 12. | ----"---- | Shri P.C.Datar |
| 13. | ....".... | Shri D.G.Marathe |
| 14. | ----"---- | Shri R.G.Sawant |
| 15. | ----"---- | Shri B.S.Chavan |
| 16. | ----"---- | Shri C.D.Fakir |
| 17. | ----"---- | Shri R.G.Sawant |
| 18. | .--"----- | Shri S.S. Momin |
| 19. | ----"---- | Shri S.G.Sinfal |
| 20. | ----"---- | Shri K.H.Waghmare |
| 21. | ----"---- | Shri S.P.Patil |
| 22. | ----"---- | Shri S.S.Momin |
| 23. | ----"---- | Shri S.G.Sinfal |